MHAH170054252019

दाखल दिनांक – २९.०८.२०१९
नोंदणी दिनांक – ११.१२.२०१९
निकाल तारीख – १०.०९.२०२५
कालावधी – ०६वर्ष १२दिवस

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, राहाता यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी श्री. पंकज रा. फुलारी)**

**नि. फौ. ख. क्र. ४७१/२०१९**
**निशाणी क्रमांक २४**

महाराष्ट्र शासन,
तर्फे राज्य उत्पादन शुल्क अधिकारी,
कोपरगाव –१, जि. अहमदनगर. ..... **अभियोगपक्ष**

**विरुध्द**

पांडुरंग संपत बिरदोडे,
वय – ३० वर्षे, व्यवसाय ––,
रा. वाकडी, ता. राहाता, जि. अहमदनगर.

..... **आरोपी**

**अधिवक्ताः**
**अभियोग पक्षातर्फेः**– सहा. सरकारी अभियोक्ता श्री. ए. एस. महाले
**आरोपीतर्फेः**– विधिज्ञ श्री. बी.एम.कोते

| | | |
|---|---|---|
| १. | गुन्हा घडल्याची तारीख | ०४.१०.२०१८ |
| २. | प्रथम वर्दी अहवाल नोंदविल्याचा दिनांक | ०४.१०.२०१८ |
| ३. | दोषारोपपत्र दाखल केल्याचा दिनांक | ०९.१२.२०१९ |

| | | |
|---|---|---|
| ४. | दोषारोप/ अपराधाचे विवरण निश्चीत केल्याचा दिनांक | ०९.१२.२०१९ |
| ५. | पुरावा सुरु केल्याचा दिनांक | १८.०२.२०२० |
| ६. | निकालासाठी राखीव ठेवल्याचा दिनांक | १०.०९.२०२५ |
| ७. | निकाल घोषित केल्याचा दिनांक | १०.०९.२०२५ |
| ८. | शिक्षा सुनावली असल्यास आदेश दिनांक | निरंक |

**आरोपीची माहिती**

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | अटक दिनांक | जामिनावर मुक्त दिनांक | ठेवण्यात आलेल्या दोषारोपाची कलमे | निर्दोष किंवा शिक्षा | शिक्षेचे वर्णन | कलम ४२८ फौ.प्र.सं. प्रमाणे कारागृह कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| १ | पांडुरंग संपत बिरदोडे | ०४.१०.२०१८ | ०४.१०.२०१८ | कलम ६५(ई) महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमान्वये. | निर्दोष | निरंक | निरंक |

**सरकार पक्ष / बचाव पक्ष / न्यायालय तर्फे साक्षीदारांची यादी**

**अ. सरकार पक्षः-**

| साक्षीदार क्र. | साक्षीदारांचे नाव | साक्षीदाराची वर्गवारी | निशाणी क्र. |
|---|---|---|---|
| १ | विजय बाळासाहेब वाघडकर | पंच | १२ |

**ब. बचाव पक्षाच्या साक्षीदारांची यादीः-** निरंक.

**क. न्यायालयाचे साक्षीदारांची यादीः-** निरंक.

**सरकार पक्ष / बचाव पक्ष/ न्यायालय तर्फे दस्तऐवजांना निशणी देण्यात आलेली यादी**

**अ. सरकार पक्षः-**

| अनुक्रमांक | निशाणी क्र. | दस्तऐवज विवरण | दस्तऐवज निशाणी देण्यात आलेले साक्षीदारांचे क्र. |
|---|---|---|---|
| १. | **१२** | घटनास्थळ पंचनामा | सा.क्र.१ |

**ब. बचाव पक्षः–** निरंक.

**क. न्यायालयातर्फे निशणीः–** निरंक.

**ड. मुद्देमाल / वस्तुः–** देशी दारु भिंगरी संत्राच्या २५ बाय १८० मि.ली. च्या रक्कम रु. १३००/– च्या सीलबंद बाटल्या, ०३ प्लास्टीकचे दारुचे वासाचे मग, ०४ काचेचे दारुचे वासाचे ग्लास.

## न्यायनिर्णय

(घोषित दिनांकः १०.०९.२०२५)

आरोपी विरुध्द कलम ६५(ई) महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमाप्रमाणे खटला चालला आहे.

**अभियोगपक्षाचे प्रकरणाची थोडक्यात हकीकत खालील प्रमाणेः–**

२. दिनांक ०४.१०.२०१८ रोजी फिर्यादी जवान एम.एस. मुजमुले व इतर कर्मचारी राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक, कोपरगाव–१ येथे हजर असताना त्यांना गुप्तबातमीदारा मार्फत खात्रीशीर बातमी मिळाली की, मौजे गणेशनगर, श्रीरामपूर रोड, ता. राहाता येथे एक इसम पत्र्याच्या शेडमध्ये देशी दारु विक्रीचा व्यवसाय करित आहे. त्यानंतर फिर्यादी, पंच व इतर कर्मचारी असे सर्वजण खाजगी वाहनाने घटनास्थळी गेले व तेथे पंचासह छापा टाकला असता पत्र्याच्या शेडमध्ये एक इसम दारु विक्रीचा व्यवसाय करताना मिळुन आला. सदर इसमास जागीच पकडुन त्याला त्याचे नाव गाव विचारले असता त्याने त्याचे नाव पांडुरंग संपत बिरदोडे असे सांगितले. त्यानंतर सदर इसमाच्या ताबे कब्जातून देशी दारु भिंगरी संत्राच्या २५ बाय १८० मि.ली. च्या रक्कम रु. १३००/– च्या सिलबंद बाटल्या, ०३ प्लास्टीकचे दारुचे वासाचे मग, ०४ काचेचे दारुचे वासाचे ग्लास असा मुद्देमाल मिळुन आला. त्यानंतर घटनास्थळी मिळुन आलेला मुद्देमाल पुढील कार्यवाहीसाठी ताब्यात घेतला. त्यानंतर जवान एम. एस. मुजमुले यांनी आरोपी विरुध्द फिर्याद दिली.

३. फिर्यादी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन आरोपी विरुध्द राज्य उत्पादन शुल्क भरारी पथक येथे गु. रं. क्र. २३४/२०१८ नुसार कलम ६५(ई) महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमा प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला. त्यानंतर सदर गुन्ह्याचा पुढिल तपास पूर्ण झाल्यानंतर न्यायालयात आरोपी विरुध्द दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपी न्यायालयात हजर झाल्यानंतर त्याच्या विरुध्द कलम ६५(ई) महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमा प्रमाणे निशाणी क्र. १० वर अपराधाचे विवरण नोंदविले.. सदर अपराधाचे विवरण आरोपीला त्याचे मातृभाषेत वाचुन व समजवुन सांगण्यात आला व त्यांनी सदर दोषारोप मान्य नसल्याचे व प्रकरणाची संपरिक्षा करण्यात यावी असे सांगितले.

५. आरोपीविरुध्द अपराधाचे तपशील सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने एक साक्षीदार तपासला. अभिलेखावर आरोपीविरुध्द सबळ पुरावा न येऊ शकल्यामुळे आरोपीचा फौ. प्र. सं. कलम ३१३ अन्वयेचा जबाब वगळण्यात आला.

६. अभियोगपक्षाची केस व आरोपी याचा बचाव या अनुषंगाने खालील मुद्ये निर्णित करणे करिता उपस्थित झाले आहेत व मी त्यांना माझा निष्कर्ष या खालील दिलेल्या कारणांकरिता पुढीलप्रमाणे देत आहे. –

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | दिनांक ०४.१०.२०१८ रोजी मौजे गणेशनगर, श्रीरामपूर रोड, ता. राहाता गावात आरोपी पांडुरंग संपत बिरदोडे एका पत्र्याच्या शेडमध्ये देशी दारु भिंगरी संत्राच्या १८० मि.ली. सीलबंद बाटल्या, ०३ प्लास्टीकचे दारुचे वासाचे मग, ०४ काचेचे दारुचे वासाचे ग्लास एकुण रक्कम रु.१४४०/– असा मुद्देमाल विनापरवाना बेकायदेशीररित्या बाळगताना मिळून आला आणि त्याद्वारे कलम ६५(ई) महाराष्ट्र दारुबंदी | नकारार्थी.. |

| | | |
|---|---|---|
| | कायद्यान्वये गुन्हा केल्याचे अभियोग पक्षाने सिध्द केले आहे काय? | |
| २ | आदेश काय? | अंतिम आदेशाप्रमाणे |

## <u>कारणमीमांसा</u>

७. अभियोगपक्षाने आरोपीविरुध्दचे दोषारोप सिध्द करणेकामी पंच साक्षीदार क्र. १ विजय बाळासाहेब वाघडकर यांना (नि.क्र. १२) वर तपासले आहे.

### <u>मुद्दा क्रमांक १ करिताः</u>

८. आरोपी वरील आरोप सिध्द करण्याकरिता अभियोगपक्षातर्फे पंच साक्षीदार क्र. १ विजय बाळासाहेब वाघडकर यांना तपासण्यात आले असुन त्यांनी त्यांचे साक्षीत त्यांना जप्ती बाबत काहीही माहिती नसल्याचे कथन केले आहे. सदर पंच साक्षीदाराने अभियोगपक्षास पुरक साक्ष दिलेली नाही त्यामुळे सरकारी अभियोक्ता यांनी न्यायालयाच्या परवानगीने त्यांना उत्तरसुचक प्रश्न विचारले परंतू आरोपीविरुध्द कोणतीही गुन्हादर्शक बाब ते अभिलेखावर आणू शकलेले नाहीत.

९. कलम ६५(ई) महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमांच्या गुन्ह्यात घटनास्थळ पंचनामा सर्वात महत्वाचा पुरावा असतो. त्यामुळे घटनास्थळ पंचनामा हा सक्षम पुराव्यानुसार सिध्द होणे अत्यावश्यक असते. त्यामुळे पोलीसांनी केलेली जप्ती सर्व संशयापलीकडे सिध्द होत नाही. एकंदरीत आरोपीविरुध्द ठेवलेला दोषारोप सर्व संशंयपलिकडे सिध्द होत नाही. करीता मुद्दा क्रमांक १ याचे उत्तर मी नकारार्थी देत आहे.

### <u>मुद्दा क्रमांक २ करिताः</u>

१०. यापूर्वीच मुद्दा क्र. १ मध्ये चर्चा केल्याप्रमाणे अभियोगपक्षातर्फे देण्यात आलेला साक्षीपुरावा आरोपी याने गुन्हा केला असे सिध्द करित नाही. आरोपी हा दोष मुक्ततेस पात्र आहे. सबब मुद्दा क्रमांक २ चे उत्तरादाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १ | आरोपी **पांडुरंग संपत बिरदोडे** यांची फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५५ (१) प्रमाणे कलम ६५ (ई) महाराष्ट्र दारुबंदी अधिनियम अन्वये पात्र असलेल्या आरोपा मधुन निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे. |
| २ | आरोपीचे वयैक्तीक जातमुचलका व हमीपत्र रद्द करण्यात येते |
| ३ | आरोपीने कलम ४३७ (अ) फौजदारी प्रक्रिया संहिते प्रमाणे रक्कम रु.१५,०००/- वैयक्तीक बंधपत्र व जामीन सादर करावा. |
| ४ | जप्त मुद्देमाल राज्य उत्पादन शुल्क यांना नाश करणेकामी अपील कालावधीनंतर पाठविण्यात यावा. (न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला). |

PANKAJ RAMDAS PHULARI Digitally signed by PANKAJ RAMDAS PHULARI Date: 2025.09.11 11:28:03 +0530

ठिकाण – राहाता. **(पंकज रा फुलारी)**

दिनांक – १०.०९.२०२५ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, राहाता.

## <u>दाखला</u>

दाखला देण्यात येतो की, पी.डी.एफ. फाईलमधील मजकूर हा मुळ न्यायनिर्णयाप्रमाणेच आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नांव | – | एस. एस. करंडे,<br>लघुलेखक (श्रेणी–३), |
| न्यायालयाचे नांव | | न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, राहाता, |
| न्यायनिर्णय जाहीर केल्याचे दिनांक | – | १०.०९.२०२५ |
| आदेशावर न्यायाधीशांनी स्वाक्षरी केल्याचे दिनांक | – | १०.०९.२०२५ |
| न्यायनिर्णय अपलोड केल्याचे दिनांक | – | ११.०९.२०२५ |